मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# नागरिकांचे निवारा केंद्रांमध्ये स्थलांतर!

## सुमारे 1000 नागरिक निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरीत : पूर परिस्थितीचा आयुक्त शेखर सिंह आढावा घेत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे तसेच धरणातून सातत्याने होणाऱ्या विसर्गामुळे शहरातील नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने नदीकाठच्या घरांमध्ये तसेच सखल भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या होत्या. या स्थळांची पाहणी करून धोकादायक ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या सुमारे १००० नागरिकांना आज महानगरपालिकेच्या वतीने निवारा केंद्रांमध्ये तसेच नातेवाईकांच्या घरी स्थलांतरित करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

पूरसदृश्य भागांची पाहणी करून नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याची कार्यवाही सुरू असून 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील बौद्धनगर, आंबेडकर कॉलनी आदी ठिकाणी बचावकार्य करण्यात आले आहे. सुमारे ३० नागरिकांना भाटनगर पिंपरी शाळा येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील जाधवघाट, रावेत आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून २९ नागरिकांना वाल्हेकरवाडी नवीन मनपा शाळा इमारत येथे स्थलांतरित करण्यात आलेआहे. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला असून नागरिकांनी दक्षता बाळगावी नदीच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



### 'ई' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील स्थलांतरण

» ई' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत रामनगर बोपखेल आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून ८३ नागरिकांना बोपखेल मनपा शाळेतील निवारा केंद्रामध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. तर 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत संजय गांधी नगर, जगताप नगर या ठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे २७ नागरिकांना यशवंतराव चव्हाण प्राथमिक मनपा शाळा तसेच कमला नेहरू मनपा शाळा येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

### पूर परिस्थितीवर नियंत्रण कक्षाद्वारे लक्ष...

» 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत जुनी सांगवी येथील मुळानगर, मधुबन सोसायटी येथील ११८ नागरिकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी मनपा शाळा येथे स्थलांतर करण्यात आले आहे. अद्याप शहरातील विविध ठिकाणी नियंत्रण पथके तैनात असून बचावकार्य सुरू आहे. संपूर्ण परिस्थितीवर मुख्य नियंत्रण कक्षाद्वारे बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून आयुक्त शेखर सिंह प्रत्येक घटनेचा आढावा घेत आहेत.

### 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील स्थलांतरण

» 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील रिव्हर रेसिडेन्सी, चिखली जवळील मनपा मैलाशुद्धीकरण केंद्रातील लेबर कॅम्प आदी परिसरात बचावकार्य करण्यात आले असून ८० नागरिकांना भोसली येथील सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. तसेच 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीत चौदे चाळ, चौदे घाट, विशालनगर, पिंपळे निलख याठिकाणी बचावकार्य करण्यात आले असून सुमारे ५० नागरिकांचे इंगोवले मनपा शाळा, पिंपळेनिलख गावठाण शाळेत स्थलांतरण करण्यात आले आहे.

# पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या ड्रोन सर्वेक्षणामुळे मिळकतींचा शोध

## महापालिकेच्या उत्पन्नात ड्रोन सर्वेक्षणामुळे होणार हमखास वाढ, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांचा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत म्हणून मालमत्ताकराकडे पाहिले जाते, या कर वसुलीसाठी यूजर फ्रेंडली प्रणाली विकसित करून त्यावर अधिक भर देत महानगरपालिकेने कर वसुली पद्धती सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. शहरातील सर्व मिळकती कराच्या कक्षेत आणण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाद्वारे मिळकतींचे सर्वेक्षण सुरू असून, त्याद्वारे महापालिकेचे उत्पन्न निश्चितपणे वाढणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ताकर आकारणी व वसुली करण्यात येत आहे. जिओ सिक्वेन्सिंग करून मनपा क्षेत्रातील सर्व मालमत्तांना प्रत्यक्ष स्थळावर जाऊन नवीन मालमत्ता क्रमांक देण्यात येत आहे. करसंकलन विभागामार्फत नागरिकांना जलद आणि सोप्या पध्दतीने सेवा मिळाव्यात, यासाठी नव्याने ऑनलाईन पध्दतीने सेवा सुविधा देण्यात येत आहेत. नव्याने करआकारणी, पुन:कर आकारणी, स्वयं मूल्यांकन, मालमत्ता नोंदणी, सवलत योजना, मालमत्ता हस्तांतरण, मालमत्ताकर उतारा आदींचा समावेश आहे. तसेच महिला, दिव्यांग व्यक्ती, पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या सोसायट्यांना सामान्य करामध्ये भरघोस सवलत दिली जात आहे.



### जिओ सिक्वेन्सिंगमुळे येणार सुसूत्रता

» मालमत्ताकर आकारणी न झालेल्या नवीन, वाढीव किंवा वापर बदल मालमत्ताकर आकारणी कक्षेत येऊन महापालिकेच्या उत्पन्न वाढीस मदत होणार आहे. मालमत्तांना सलग क्रमांक देण्यासाठी संपूर्ण मालमत्तांची सलग नोंदणी केल्यामुळे यापुढे कोणतीही मालमत्ता शोधण्यास अडचण निर्माण होणार नाही. तसेच भविष्यातील बिलवाटप, वसुली, जप्ती नोटीस वाटप आदी आवश्यक कामांत अधिक सुसूत्रता येणार असून कामे जलद गतीने पूर्ण करता येतील.

### डिजिटल लॉकर होणार उपलब्ध

» मालमत्तेची सर्व माहिती अद्ययावत करण्यात येत आहे. नागरिकांना मालमत्तेची माहिती, मालमत्ताकर दाखला आदींबाबतची माहिती नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर उपलब्ध होणार आहे. यासाठी डिजिटल लॉकरची सुविधा उपलब्ध करून देण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

# जेवणाची, रहाण्याची, लागेल ती मदत करा : मुख्यमंत्री अ‍ॅक्शन मोडमध्ये

## पुण्याला रेड अलर्ट जारी करण्यात आला त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री अजित पवार यांनी प्रशासनला सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात रविवारी सकाळपासून पावसाला सुरूवात झाली आहे. मागील आठवड्यात पुण्यात पुरस्थिती निर्माण झाली होती. यामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने नुकसान झाले होते. यातच आता आज पुण्याला रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री अजित पवार यांनी प्रशासनला सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

खडकवासला धरणातून आज सकाळी 11 वाजता मुठा नदीत सध्या 35000 क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. एकतानगर मधील द्वारका अपार्टमेंटचे पार्किंग पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. एकतानगर मधील इतर सोसायटीच्या बाहेर सुद्धा पाणी साचायला सुरुवात झाली आहे. भारतीय लष्कर जवान, अग्निशमन दल पोलीस कर्मचारी तसेच महापालिका प्रशासन घटनास्थळी दाखल झाले आहे.

सिहंगड रस्ता, एकता नगरी येथे पाण्याची पातळी वाढत असल्याने अग्निशमन दलाच्या जवानांनी सद्यस्थितीत जवळपास 25 नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत केले आहे. याबरोबरच एक श्वान एक मांजर यांची ही काळजी घेत आपले कर्तव्य बजावले. तर पिंपरी चिंचवड येथे NDRF तैनात करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुणे जिल्ह्यातील ब्लू लाईन म्हणजेच धोकादायक पूर रेषेच्या आतील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर आदेश दिले आहेत. पुणे जिल्ह्यातील पूर परिस्थिती निर्माण झाल्यास त्याआधीच नागरिकांच्या सुरक्षेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष लक्ष असल्याचं दिसत आहे.



### पूररेषेत सुमारे 3 लाख घरे

» जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका, जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने एक आराखडा तयार करावा अशी मागणी देखील केली गेली. ज्याला मान्यता देत मुख्यमंत्र्यांनी तात्काळ पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. पुण्यातील पूरग्रस्त भागातील विशेषतः एकता नगर, सिंहगड याठिकाणी निळ्या पूररेषेत सुमारे 3 लाख घरे पण या ठिकाणी एफएसआय मिळत नसल्याने विकासक पुनर्विकासासाठी पुढे येत नाहीत असे निदर्शनास आणून दिले गेले. यावर याठिकाणी विशेष दर्जा देऊन पुनर्विकासाचे काम करावे तसेच तसा आराखडा तयार करावा असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचं मनसेनं सांगितलं.

### एकतानगरमध्ये पाणी भरण्यास सुरुवात

» पुण्यातील एकतानगर भागात पुराचं पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. एकतानगरमधील द्वारका सोसायटीच्या पार्किंगमध्ये पाणी भरलं आहे. खडकवासला धरणातून मुठा नदीत पाण्याचा मोठा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे पुण्यातील एकतानगरचा भाग जलमय झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरुच आहे त्यामुळे पाण्याचा विसर्ग वाढवण्यात येणार आहे.

### पूर संरक्षक मजबूत भिंत बांधणे सुरु करावी

» मनसेचे अध्यक्ष राज ठाकरेंसहीत त्यांच्या नेत्यांच्या शिष्टमंडळाबरोबर झालेल्या बैठकीमध्ये मनसेनं पुण्यातील निळ्या पूररेषेतील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा आराखडा तातडीने तयार व्हावा अशी मागणी अजय शिंदे, बाळा शेडगे आणि रणजित शिरोळे यांनी केली होती. पुण्यात नुकतीच आलेली पूर परिस्थिती वारंवार होऊ नये म्हणून तात्पुरता उपाय म्हणून खडकवासला, एकता नगर, सिंहगड येथे पूर संरक्षक मजबूत भिंत बांधणे सुरु करावी. निळ्या पूर रेषेतील ( ब्ल्यू लाईन) नागरिकांचे कायमस्वरूपी पूनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे महानगरपालिका, जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने एक आराखडा तयार करावा

# कास्यंपदक विजेता स्वप्निल यास पदोन्नती; मुंबई रेल्वे विभागात विशेष अधिकारी म्हणून बढती

## पुणे रेल्वे विभागातील वरिष्ठ तिकिट तपासणीस स्वप्निल कुसाळे यास मध्य रेल्वेकडून मुंबई रेल्वे विभागात पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे विभागातील वरिष्ठ तिकिट तपासणीस स्वप्निल कुसाळे पॅरिस ऑलंपिकमध्ये भारताचे नेतृत्व करत आहे. या ऑलंपिकमध्ये त्याने कास्यंपदक पटकविले आणि मध्य रेल्वेकडून त्याला पदोन्नती देत त्याची मुंबई रेल्वे विभागात विशेष अधिकारी म्हणून पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे.

पुणे रेल्वे विभागामध्ये विविध पदावर नेमणुकीस असलेले १२४ खेळाडू आहेत. त्यामध्ये सर्वाधिक खेळाडू हे फ्री स्टाईल रेसलिंग आणि रायफल शुटिंग या दोन प्रकारामध्ये आहेत. रायफल शुटिंग प्रकारातच स्वप्निल कुसाळे याने देशाला कास्य पदक मिळवून दिले आहे. स्वप्निल कुसाळे हा रेल्वेमध्ये २०१५ मध्ये भरती झाला, पुणे रेल्वे विभागात नेमणुकीला होता.

स्वप्निल कुसळेने पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन प्रकारात तिसरा क्रमांक पटकावून कांस्यपदकाची कमाई केली. नेमबाजीच्या या प्रकारात ऑलिम्पिक पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय ठरला आहे. त्यांच्या या अपवादात्मक कामगिरीची दखल घेऊन, रेल्वे मंडळाने कुसळे यांना गट क मधून गट ब राजपत्रित संवर्गात पदोन्नती मंजूर केली आहे.

भारतीय रेल्वेने नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे आणि त्यांना सरावासाठी कामाच्या व्यापातून अत्याधुनिक क्रीडा पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या समर्पण आणि मेहनतीमुळे भारतीय रेल्वे आणि देशाला मोठा सन्मान मिळाला आहे, असे मध्य रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.




### पुणे रेल्वे विभागाच्या व्यवस्थापक इंदु दुबे यांचाकडून अभिनंदन

» नियमानुसार खेळाडूंना ३३० दिवस काम आणि ३५ दिवस सुट्टी दिली जाते. त्यानुसार कुसाळे हा बालेवाडी येथील शुटींग रेंज येथे सराव करत होता. दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून त्याची पदोन्नती रखडली होती. ती त्याने पदक जिंकल्यानंतर तत्काळ देण्यात आली. पुणे रेल्वे विभागाच्या व्यवस्थापक इंदु दुबे यांनी कुसाळे यांचे अभिनंदन करत पदक जिंकल्याचा अभिमान असल्याचे म्हटले आहे.

### पुणे रेल्वे विभागात 124 खेळाडू...

» पुणे रेल्वे विभागातील विविध पदावरील रेसलिंगमध्ये ५० खेळाडू आहेत. तर, शुटिंगमध्ये आठ, ऍथलेटिक खेळात सहा, बॅडमिंटन, बॉक्सिंग, बॉडी बिल्डींग, फुटबॉल, महिला क्रिकेट, पुरूष क्रिकेट प्रत्येकी तीन, पुरुष हॉकी, सायकलिंग, व्हॉलीबॉल पुरुष प्रत्येकी पाच, गोल्फ एक, व्हॉलीबॉल पुरुष आणि महिला १५, कबड्डी २, वेटलिफ्टिंग एक, वॉटर पोलो ५, चेस एक अशा खेळाडूंचा समावेश आहे. रेल्वेकडून नियमितपणे खेळाडूंना प्रोत्साहन दिले जाते. सध्या रेल्वेत असलेल्या खेळाडूंना सर्व सवलती दिल्या जात असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार-खासदारांत श्रेय घेण्यावरून वाद

## एलिव्हेटेड कॉरिडोरचे श्रेय नेमके कोणाचे ? विधानसभेच्या तोंडावर आमदार महेश लांडगे, खासदार अमोल कोल्हे यांच्यात चुरस

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड आणि चाकण येथील औद्योगिक वसाहतींना जोडण्यासाठी महत्त्वाचा असणारा नाशिक फाटा ते खेड या दरम्यानचा रस्ता आठ पदरी होणार आहे. यासाठी ७ हजार ८२७ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. त्यासाठीचा निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मार्गामुळे चाकणची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मोठी मदत होणार आहे. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाचे श्रेय घेण्यावरुन आमदार आणि खासदारांत वाद सुरू झाला आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शुक्रवारी (२ ऑगस्ट) झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. देशात ९३६ किलोमीटर अंतराच्या आठ मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्च होणार आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या नाशिक फाटा ते खेड कॉरिडॉर या आठ पदरी एलिव्हेटेड ३० किलोमीटर अंतराच्या मार्गांचा समावेश आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी मी केंद्र व राज्य सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आसल्याचे आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे. तसेच पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासाला नवा आयाम या निमित्ताने मिळणार आहे. या प्रकल्पामुळे नाशिक फाटा ते खेड अंतर अगदी काही मिनिटांत पार करता येईल. शहराच्या विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने आमदार महेश लांडगे यांनी आभार मानले आहेत.

तर दुसरीकडे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानतानाच अजित गव्हाणे यांच्या माध्यमातून आमदार महेश लांडगे यांच्यावर टीका केली आहे. चाकणची वाहतूक कोंडी हा अतिशय गंभीर व चिंतेचा विषय बनला होता. त्यामुळे खासदार डॉ. कोल्हे सातत्याने या एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजुरी मिळावी यासाठी पाठपुरावा करीत होते. सध्या सुरू असलेल्या संसद अधिवेशनात त्यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट घेऊन तातडीने या एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजुरी मिळावी, असा आग्रह धरला होता. त्यावेळी लवकरच मंजुरी देण्याचे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार मंजुरी दिल्याचे गव्हाणे यांनी सांगितले. तसेच हे जणू काही मीच केले असे दाखवत भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी एक व्हीडीओ शेअर करत पंतप्रधान व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले असल्याची टीका गव्हाणे यांनी केली आहे.



### आमदार आणि खासदारांत वाद

» पिंपरी-चिंचवड आणि चाकण येथील औद्योगिक वसाहतींना जोडण्यासाठी महत्त्वाचा असणारा नाशिक फाटा ते खेड या दरम्यानचा रस्ता आठ पदरी होणार आहे. यासाठी ७ हजार ८२७ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. त्यासाठीचा निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मार्गामुळे चाकणची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मोठी मदत होणार आहे. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाचे श्रेय घेण्यावरुन आमदार आणि खासदारांत वाद सुरू झाला आहे.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या माध्यमातून आणि केंद्रीय वाहतूक मंत्री मा. नितीन जी गडकरी यांच्या पुढाकाराने बहुप्रतिक्षित या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्ट्यातील प्रमुख आर्थिक केंद्रांना जोडणारा दुवा निर्माण होणार आहे. मी केंद्र व राज्य सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला असून, मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती झाल्याचे समाधान आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार**

> नाशिक फाटा ते चांडोली या राष्ट्रीय महामार्गासाठी गेली ३-४ वर्षे अनेक पातळ्यांवर लढाई लढावी लागली. सततच्या पाठपुराव्यामुळे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी लोकसभा निवडणुकीच्या आधी या एलिव्हेटेड कॉरिडॉरची निविदा प्रक्रिया सुरू केली होती. त्यानंतर आता या एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजुरी मिळाल्यामुळे माझ्या प्रयत्नांना यश मिळाल्याचा आनंद आहे. प्रत्येक मी टप्प्यावर पाठपुरावा करणार असून, मतदारांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.
>
> **- डॉ. अमोल कोल्हे, खासदार**

# शहरातील बीआरटीच्या स्पॉटवर सीसीटीव्हीसाठी लावण्यात येणारी सुरक्षा यंत्रणा चोरीला

## सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यापूर्वीच 60 ठिकाणी केबल्स, पाईप, साहित्य लंपास; प्रशासनावर साहित्य पुन्हा बसवण्याची वेळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील बीआरटी मार्गिकांमध्ये सुरक्षितता वाढावी, खासगी वाहनांची घुसखोरी थांबावी आणि पोलीस प्रशासनालाही त्याचा तपासात उपयोग व्हावा यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. जूनअखेरीस ते काम पूर्ण देखील होणार होते. मात्र, बीआरटीच्या मार्गातील जवळपास ६० स्पॉटवर सीसीटीव्हीसाठी लावण्यात येणारी यंत्रणा चोरीला गेली आहे. परिणामी, हे कॅमेरे बसण्यापूर्वीच त्यामध्ये अडथळा निर्माण झालेला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरवासियांचा प्रवास जलद व्हावा यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून अवाढव्य खर्च करून बससाठी संयुक्त रॅपिड ट्रान्झिट मार्गिका (बीआरटी) उभारण्यात आली. शहरात ५३ किलोमीटर बीआरटी सुरू आहे. बीआरटी मार्गामध्ये एकूण ४८० कॅमेरे बसवण्याचे नियोजन आहे. त्यामधील पहिल्या काही टप्प्याचे कॅमेरे बसवण्याचे काम पूर्ण झाले. प्रत्येक थांब्याच्या एन्ट्री पॉईंटला आत व बाहेरील दोन्ही ठिकाणी प्रत्येकी दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. मार्गिकेमधून जाणाऱ्या दुचाकी, चारचाकी, रिक्षाचालक यांच्यावर नजर ठेवता येणार आहे त्याशिवाय थांब्यांवर घडणाऱ्या चोरीच्या घटना, इतरही अनुसूचित प्रकार रोखता येणार आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून याचे काम सुरू होते. जून महिन्यामध्ये ते काम पूर्ण होऊन प्रत्यक्षात हे सीसीटीव्ही कार्यान्वित होतील, असा अंदाज स्मार्ट सिटीतर्फे वर्तवण्यात आला होता. त्यासाठी खोदकाम, बस थांब्यावर खांब बसवणे, केबल टाकणे असे कामही पूर्ण झाले होते.



### पावसामुळे आधीच उशीर आता चोरीमुळे पुन्हा लांबणार

» बीआरटी मार्गावरील सीसीटीव्ही लवकर सुरू करण्याचा मानस होता. मात्र पावसामुळे काही कामात व्यत्यय आल्याने व काही कामे बाकी असल्याने तो वेळेवर होऊ शकला नाही. त्यानंतर आता चोरी झाल्याने पुन्हा हा प्रकल्प लांबणार असे दिसून येते. संबंधित ठेका दिलेल्या कंपनीकडून या उभारणीचे काम पुन्हा नव्याने करण्यात येणार आहे.

### असा होता प्रकल्प

- » बीआरटी किलोमीटर ५२
- » कॅमेरे बसवण्यात येणारे थांबे ३९९
- » एकूण सीसीटीव्ही कॅमेरे ४८०
- » लोकेशन १०५

# मुसळधार पाऊस होत असल्याने नीरा नदीला महापूर

**नीरा नदी खोऱ्यात असलेली चारही धरणे आता पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे नीरा पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

नीरा नदी खोऱ्यात असलेली चारही धरणे आता पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे नीरा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात सोडण्यात येत आहे. त्या पाण्यामुळे नीरा नदीला पूर सदृशस्थिती निर्माण झाली आहे. नीरा नदीकाठी असलेला दत्त घाट पाण्याखाली गेला आहे. तर नीरा नदीकाठच्या घरांमध्ये पाणी जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याबरोबर नीरा नदीकाठच्या ब्रिटिश कालीन पुलाला हे पाणी टेकले आहे. तर पाटबंधारे विभागाच्यावतीने नीरा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिलेला आहे.

नीरा नदीच्या खोऱ्यामध्ये मागील तीन आठवड्यापासून संततधार पाऊस पडत आहे. डोंगर माथ्यावर जोरदार पाऊस होत असल्याने हे पाणी नीरा खोऱ्यात असलेल्या धरणांमध्ये साठत आहे. त्यामुळे नीरा खोऱ्यातील चारही धरणे आता तुडुंब भरली आहेत. या धरणांमधून नीरा नदीच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नीरा नदीला महापूराची स्थिती निर्माण झाली आहे.

नीरा नदी खोऱ्यातील भाटघर नीरा देवघर धरण शुक्रवारी (दि. 3) तुडुंब भरले आणि या धरणाच्या स्वयंचलित दरवाजामधून नीरा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरू झाला. तत्पूर्वीच नीरा नदीमध्ये वीर धारणामधून 15 हजार क्युसेकने पाणी सोडण्यात येत होते. त्यात या दोन्ही धरणातून येणाऱ्या पाण्याची भर पडली आणि वीरधरणांमधून पाणी सोडण्याच्या प्रमाणात मोठी वाढ करण्यात आली. गेली दोन वर्षे नीरा नदीला कोणत्याही प्रकारे पूर आला नव्हता. मात्र मागील पंधरा दिवसापासून नीरा नदीचे पाणी थांबलेले नाही. नीरा नदीला आलेल पाणी पाहून नीराकाठचा शेतकरी सुखावला असला तरी वरूणराजा आणखीच बरसत राहिला तर मोठे नुकसान होऊ शकते असे म्हणत शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आता चिंतेची लकीर सुद्धा पाहिला मिळत आहे.

नीरा नदीच्या खोऱ्यामध्ये मागील तीन आठवड्यापासून संततधार पाऊस पडत आहे. डोंगर माथ्यावर जोरदार पाऊस होत असल्याने हे पाणी नीरा खोऱ्यात असलेल्या धरणांमध्ये साठत आहे. चारही धरणात मिळून पाणीसाठा निर्माण झाला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत जास्त असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.



### गेल्यावर्षीपेक्षा आठ टिमएमसी अधिक साठा

» नीरा नदीच्या खोऱ्यामध्ये मागील तीन आठवड्यापासून संततधार पाऊस पडत आहे. डोंगर माथ्यावर जोरदार पाऊस होत असल्याने हे पाणी नीरा खोऱ्यात असलेल्या धरणांमध्ये साठत आहे. चारही धरणात मिळून एकूण 46.755 टीएमसी इतका पाणीसाठा निर्माण झाला आहे. तर गेल्यावर्षीच्या तुलनेत 8 टीएमसी इतका जास्त असल्याची माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.

### वीरमधून 43 हजार क्युसेकने विसर्ग

» वीर धरणांमधून नीरा नदी पात्रामध्ये शनिवारी (दि. 3) दिवसभर 43 हजार क्युसेकने पाणी सोडण्यात येत होते. दिवसभर याच प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने निरा नदी काठच्या गावांमध्ये चिंतेच वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

### पाणीसाठा आणि धरणांमधून होणारा विसर्ग

| धरण | पाणीसाठा (टीएमसी) | टक्के | विसर्ग |
|---|---|---|---|
| » भाटघर | 23.502 | 100 | 15631 |
| » नीरा देवघर | 11.126 | 94.86 | 4538 |
| » वीर | 8.868 | 94.26 | 42983 |
| » गुंजवणी | 3.259 | 88.33 | 2174 |

# राजगड तालुक्यातील गाव व वाड्या वस्त्यांवरील जनजीवन विस्कळीत

**मागील पंधरा दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे राजगड तालुक्यातील गाव व वाड्या वस्त्यांवरील जनजीवन विस्कळीत झाले आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

मागील पंधरा दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे राजगड तालुक्यातील गाव व वाड्या वस्त्यांवरील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणचे रस्ते वाहून गेले असून अनेक ठिकाणी रस्त्यांवर रोडवर मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. तर जवळ जवळ सर्वच रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. विजेचा लपंडाव तर राजगडकरांच्या पाचवीलाच पुजला आहे. मोबाईलला रेंज नाही आणि असली तरी मोबाईल चार्ज करण्यासाठी विजेचा पत्ताच नाही, अशीच परिस्थिती सध्या पाहायला मिळत आहे.

बारागाव मावळ गुंजवणे खोरे, १८ गाव मावळ, पानशेत आणि सोंडे व विंझर भागात अशा चोहीकडे रस्त्यांची दुरवस्था झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेक गावांचा संपर्कही तुटला आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये दहा ते पंधरा दिवसांपासून बत्ती गुल असून पिठ गिरण्या बंद असल्याने अनेक घरांमध्ये भाकरी सध्या पाहायलाच मिळत नाही. तर अनेक गावांमध्ये महिन्याला मिळणारे सरकारी धान्य पोहोचलेच नाही. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण म्हणून तालुक्याची ओळख आहे याची कल्पना असूनही प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे पूर्व नियोजन करण्यात आले नाही, असे स्थानिकांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे अशा स्थितीला स्थानिक नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. खरे तर पावसाळा सुरू होण्याअगोदर रस्त्यांची कामे होणे अपेक्षित असताना याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.



> वेल्हे तालुक्याचे नामकरण राजगड तालुका असे करण्यात आल्याचे राजकारण मोठ्या प्रमाणात झाले. मात्र, येथील विकास कारण कोणालाच सोडविता आले नाही. रस्ते, बीज, पाणी, रेशनिंग धान्य वाटप किंवा महसुली कामे या सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात अडचणी आहेत. सरकारी अधिकाऱ्यांची अरेरावी, ठेकेदारांचा उन्मत्तपणा आणि राजकीय नेत्यांची उदासीनता तालुक्याच्या विकासाला मारक ठरत आहे.
>
> **- आनंद देशमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य, वेल्हे**

> तालुक्यामध्ये रस्ते वीज किंवा अन्य कामाबाबत सध्याची जी परिस्थिती निर्माण झालेली आहे यास सर्वस्वी प्रशासकीय अधिकारी प्रामुख्याने बांधकाम विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत. वारंवार मागणी करून सुद्धा रस्त्यांची कामे करण्यामध्ये चालढकल करण्यात येत आहे. सर्वच स्तरावर ठेकेदारांचे हित जपण्याचे काम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.
>
> **- किसनभाऊ रसाळ, माजी सरपंच चिरमोडी**